# <u>रत्नागिरी नगर परिषद</u>

## निविदा सुचना क्र ६ सन २०११-२०१२

रत्नागिरी नगर परिषदेकडील खाली नमूद केलेली कामें योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदरांकडून मोहरबंद बाबवार दराच्या निविदा मागविणेत येत आहे.

कामाची निविदा दिनांक २४-०८-२०११ ते ३०-०८-२०११ या मुदतीत कार्यालयीन कामाचे दिवशी सकाळी ११.०० ते सांयकाळी ४.०० या वेळेत नगर परिषद कार्यालयांत कामकांजाचे वेळी आवश्यक ते शुल्क भरुन मिळतील.निविदा पोस्टाने पाठविल्या जाणार नाहीत.

यथोचितरित्या भरलेली आणि सर्व दृष्टिने परीपूर्ण निविदा दि. ०२-०९-२०११ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारणेत येतिल व शक्य झाल्यास त्या दिवशी दुपारी ४.०० वाजता कंत्राटदारांसमोर अथवा त्यांच्या प्रतिनिधी समोर उघडण्यात येतिल .खाली दर्शविल्याप्रमाणे बयाणा रक्कम रोखीने नगर परिषद कार्यालयात भरावी लागेल .कंत्राटदारांनी त्यांची निविदा मंजूर झाल्याचे कळविले पासून १० दिवसाचे मुदतीत आवश्यक ते करारपत्र करुन दयावे लागेल.

सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही . करारनामा लिहून दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करुन दयावे लागेल. कोणतेही साहीत्य किंवा यंत्रसामूग्री नगर परिषदेकडून उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत . जागेवरील परिस्थितीप्रमाणे मंजूर कामांत घट केली गेल्यास त्या बाबत कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची नूकसान भरपाई दिली जाणार नाही. या संबधी आवश्यक ती माहीती नगर परिषद कार्यालयांत बांधकाम विभागात कार्यालयीन वेळांत मिळू शकेल.

कोणतेही एक निविदा स्विकारणेचा अथवा कारणाशिवाय सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवणेत येत आहे.

सदर निविदा सूचना www.ratnagirinagarparishad.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम | कामाची बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म किंमत | काम पुर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | बारावा वित्त आयोगाअंतर्गत शिवाजी स्टेडियम मागिल बाजूला नगर परिषद भूखंड क्रमांक १६५ ब मध्ये मच्छीमार्केट व व्यापारी संकुल इमारत बांधणे | रु.५९०८४६२/- | रु २००००/- | रु १५००/- | तीन महीने |

टिप — १) निविदा दोन लखोटा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत . लखोटा क्रमांक १ मध्ये नोंदणीप्रमाणपत्र आयकर ,विक्रिकर इत्यादी आवश्यक अशी कागदपत्रे सादर करण्याची आहेत. .लखोटा क्रमांक २ मध्ये निविदा सादर करणेची आहे.

२) अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराची निविदा भरणेची नाही.

नगर परिषद कार्यालय,
रत्नागिरी दिनांक — १८/०८/२०११

**मुख्याधिकारी**
**रत्नागिरी नगर परिषद**